स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता
मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबतचे निकष

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. ०४/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०९/०३/२०१६.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषयः- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादी व मतदान केंद्र निश्चितीबाबतचे निकष

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/५/२०१५ च्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर सूचनांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

(१) सूचना क्रमांक- (iv) च्या शेवटी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-
"लोकसभा व विधानसभा निवडणुकांकरिता मतदाराचे नाव ज्या मतदान केंद्रावर होते, शक्यतोवर त्याच मतदान केंद्रावर (मतदान केंद्राची इमारत) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता त्याचे नाव ठेवण्यात यावे. तसेच एका कुटुंबातील सर्व मतदार एकाच मतदान केंद्रावर असतील याची दक्षता घेण्यात यावी."

(२) सूचना क्रमांक- (vii) च्या शेवटी नवीन परिच्छेदात पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-

"मतदान केंद्र निश्चित केल्यानंतर व यादी प्रसिध्द झाल्यानंतर जर काही कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबत महानगरपालिका आयुक्त व इतर निवडणुकांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता राहील व तसा बदल करण्यात आल्यानंतर तसे राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे. "

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत : १. सर्व अधिकारी/सर्व कार्यासने, राज्य निवडणूक आयोग
२.निवडनस्ती

F:\महानगरपालिकांची पत्रे\महानगरपालिका निवडणुकीची पत्रे.docx

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०१५
मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र
निर्मितीबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ-२०१५/प्र.क्र. ९ /प्रकल्प कक्ष,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७/०५/२०१५.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका-२०१५
मतदान केंद्र निश्चिती व आदर्श मतदान केंद्र निर्मितीबाबत...

संदर्भ:-१) राज्य निवडणूक आयोगाकडील मतदान केंद्रविषयक आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंसनि/२०१०/प्र.क्र.०२/का-७, दिनांक-१२/७/२०१०.
२) क्रमांक-रानिआ/ग्रापनि-२०१०/प्र.क्र.२०/का-८,दिनांक-१४/१०/२०१० चे पत्र
३) क्रमांक-रानिआ/२०१०/प्र.क्र.४/का-०५, दिनांक ३०/७/२०११ चे पत्र
४) क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.०४/का-५, दिनांक-१५/९/२०११ चे पत्र
५) क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दिनांक- ७/१/२०१५.

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३ के, २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत, निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडणे तसेच या निवडणुकांचे नियंत्रण, संचालन व अधिक्षण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

२. निवडणुकांच्यावेळी "मतदान केंद्र" हा महत्वाचा विषय असून भारत निवडणूक आयोगाच्या निवडणुकीच्यावेळी घेण्यात येणारी सर्व दक्षता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही घेणे आवश्यक आहे.

३. राज्य निवडणूक आयोगाकडून यापूर्वी निर्गमित झालेल्या संदर्भाधीन आदेशामधील मतदान केंद्रविषयक सूचना अधिक्रमित करून मतदान केंद्र निश्चितीबाबत, भारत निवडणूक आयोगाची आदर्श मतदान केंद्राविषयीची तत्वे व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अधिनियम व नियमातील तरतुदी लक्षात घेऊन खालील सूचना देण्यात येत आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदार संघ हा प्रभागात/निर्वाचन गट/ गणामध्ये विभागलला असतो व प्रत्येक प्रभाग हा **भौगोलिकदृष्टया सलग प्रदेश** असतो. सबब, **प्रत्येक प्रभाग, गट/गणाकरिता किमान १ मतदान केंद्र असणे आवश्यक आहे.**

(ii) ग्रामपंचायतीमध्येच म्हणजेच **बहुसदस्यीय पध्दती लागू असणाऱ्या** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एका मतदान केंद्रास जोडणाऱ्या **मतदारांची संख्या ८०० हून अधिक** असू नये. परंतु, जिल्हा परिषद/पंचायत समिती, महानगरपालिका, नगर परिषदा सारख्या **एक सदस्यीय पध्दती** लागू असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतदारांची संख्या **जास्तीत जास्त १२०० ते १४००** असण्यास हरकत नाही. परंतु, सदर मतदान केंद्रावर १४०० हून अधिक मतदार असू नयेत. तसेच मागील निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अशा केंद्रांवर अतिरिक्त मतदान अधिकारी नेमावा.

(iii) भौगोलिकदृष्टया मतदान केंद्र हे जोडलेल्या भागाच्या मध्यावर असावे. जेणेकरून, मतदान केंद्रास जोडलेल्या कोणत्याही मतदारास **२ किमीपेक्षा अधिक प्रवास** करावा लागू नये. सबब, विरळ लोकसंख्या/भौगोलिक कारणास्तव विखुरलेल्या /

विभागलेल्या वस्त्यांमध्ये कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र तयार केल्यास हरकत नसावी. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(ई))

(iv) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शक्यतोवर एका **इमारतीत शहरी भागात जास्तीत जास्त ४ व ग्रामीण भागात जास्तीत जास्त २ केंद्रे** ठेवावीत. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(एफ))

(v) मतदान केंद्राची जागा **किमान २० चौ. मीटर** असेल. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(सी))

(vi) मतदान केंद्रात जाणे-येणे कामी स्वतंत्र Entry-Exit असावे. जेथे अशी सोय नसेल तेथे दोरीच्या सहाय्याने तात्पुरती व्यवस्था करावी. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(बी))

(vii) **मतदान केंद्र हे पक्क्या इमारतीत** असावे. तसेच शासकीय /निमशासकीय शाळा, कार्यालये किंवा अनुदानित शाळा/कार्यालयांच्या इमारतीतच असावे. जेणेकरून, टेबल-खुर्च्या व इतर सोयी निर्माण करणे सोपे जाते. सुरक्षिततेच्या दृष्टीनेदेखील सदर बाब योग्य होते. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापन करावयाचे झाल्यास आयुक्त, महानगरपालिका व जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी सर्व कारणमिमांसा जाणून घेऊन मगच अशा मतदान केंद्रांना परवानगी द्यावी.

खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापतेवेळी त्याच्या मालकाची लेखी संमती असणे आवश्यक राहील.

खाजगी इमारतीतील मतदान केंद्राच्या बाबत अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर इमारतीत कोणत्याही पक्षाचे कार्यालय/उमेदवार/हितचिंतक/पाठीराखा

रहात नसल्याची/मालकी नसल्याची खात्री करावी. असल्यास मतदान केंद्र अन्य ठिकाणी नेण्याची पर्यायी व्यवस्था करावी.

मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या २४ तास अगोदर असे मतदान केंद्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावे. (राज्य निवडणूक आयोगाकडील ०२/०३/१९९५ चे आदेश) (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(के),(एम),(एन))

(viii) मतदान केंद्राचा २०० मीटर परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या २०० मिटर परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाही. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(एन))

(ix) कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही स्थितीत पोलीस स्टेशन, हॉस्पिटल, देऊळ, धार्मिक इमारतीत नसेल. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.२.१(ओ))

(x) मतदान केंद्रात खालील मुलभूत सुविधा पुरवण्यात याव्यात:- (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका तसेच भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST- BMF/२०१३-EPS, दिनांक २७/१/२०१४)

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

(b) मतदान केंद्रावर वृध्द/अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

(c) मतदान केंद्र सुरक्षित पक्क्या इमारतीतच असावे. खिडक्या, दरवाजे, पंखे आणि विद्युत पुरवठा यांची तपासणी करून घ्यावी.

(d) मतदान केंद्रावर **भरपूर उजेड व हवा** असेल याची तपासणी करावी. मतदान केंद्र निश्चितीपूर्वी तपासणीच्यावेळी या सर्व बाबींची नोंद घ्यावी. बल्ब, लाईट्स, फॅन्स, स्वीचेस, वायरिंग तपासणी करून घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या क्षेत्रात लोड शेडिंग असणार नाही याची खात्री संबंधित यंत्रणेला (MSEB/RELIANCE/TATA) आवश्यक आदेश देऊन करावी. तसेच आवश्यकतेनुसार जनरेटरचीही सोय ठेवावी.

(e) मतदान केंद्रावर **स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय** आहे याची खात्री करावी. उन्हाळयात प्रत्येक केंद्रावर मातीच्या मडक्यात (२ ग्लास सोबत ठेवावेत) स्वच्छ पिण्याचे पाणी ठेवावे. ते मडके सातत्याने भरलेले राहील याकडे लक्ष द्यावे.

(f) मतदान केंद्रावर किमान आवश्यक फर्निचर (टेबल, खुर्च्या, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहतेवेळी सावलीसाठी शेडस्) ची उपाययोजना करावी. Entry-Exit साठी आवश्यक तेथे बांबूची किंवा दोरीची बॅरीकेटिंग करून घ्यावी.

(g) स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत याची खात्री करावी. मतदानाच्यावेळी त्याच्या स्वच्छतेबाबतचीही काळजी घ्यावी.

(h) मतदान केंद्राच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ "मतदार सहाय्य केंद्र" स्थापित करावे. त्यावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत, मतदारांची वर्णानुक्रमे नावे असलेली एक यादी, मतदान केंद्राचा (मतदार अनुक्रमांक ................ ते ................. मतदान केंद्र क्रमांक) तपशील असावा. जेणेकरून मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी व संबंधित मतदान केंद्रात पाठविण्यासाठी सहाय्य करणे सुलभ होईल.

(i) मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची (मतदान केंद्र सहाय्य शौचालय, पाणी) माहिती दर्शविणारे फलक

(j) उन्हाळयात होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून आवश्यक ती प्रथमोपचार, औषधे (जसे De-hydration Medicine) मतदान अधिकाऱ्यांसोबत द्यावीत. सर्व मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत साखर-मीठाच्या पुडया मतदान साहित्यात द्याव्यात. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४५८/४/९८PLN-IV, दिनांक १/६/१९९८)

(k) भौगोलिक परिस्थिती व वातावरण यांचा अंदाज घेऊन उष्माघातात आवश्यकतेनुसार लोकांनी घ्यावयाच्या काळजीबाबतच्या सूचनांसह प्रसिध्दी द्यावी. "आरोग्य अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करून घ्याव्यात व त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आवश्यक त्या औषधांसोबत फिरतीवर ठेवणे. जेणेकरून, गरजेनुसार ते उपचार करू शकतील. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४५८/४/९८PLN-IV, दिनांक १/६/१९९८)

(l) पावसाळयात मतदान केंद्राबाबत तितकीच काळजी घेणे आवश्यक असून मतदान केंद्रात छपरातून पाणी गळणे वा चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मतदान केंद्राच्या छपरावर आवश्यक असल्यास ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी.

(xi) मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह/आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असण्यास हरकत नाही. त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे. (निवडणूक निर्णय अधिकारी माहितीपुस्तिका २.३.१)

(xii) परदानशीन स्त्रियांसाठी किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळत असल्याने प्रत्येक मतदान अधिकाऱ्यांच्या टीममध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल. आवश्यकतेनुसार कमी खर्चाचे पार्टिशन (बेडशीट/चारपाईचा उपयोग) तयार करून घ्यावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-५७६/११/ESO/२४/९४, दिनांक २१/१०/१९९४)

(xiii) शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात, **जिथे शक्य नसेल तिथे रांगेतील एका पुरुषामागे २ स्त्रिया याप्रमाणे मतदान** करू द्यावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२०११-EPS, दिनांक २६/१२/२०११)

(xiv) ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीक/अपंग/गरोदर स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करू द्यावे. असे करीत असताना इतर मतदाराकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळविणेकामी राज्य निवडणूक आयोगाच्या सदरच्या सूचनांना माफक प्रसिध्दी द्यावी. तसेच या सर्व सूचनांबाबत मतदान कर्मचारीवृंदानाही प्रशिक्षणादरम्यान सूचित करावे. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/२००९-EPS, दिनांक ३०/०४/२००९)

(xv) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही. २०० मीटर परिघाच्या बाहेर प्रत्येक उमेदवारास केवळ १ मतदार सहाय्य केंद्र उभारता येईल. सदर केंद्रावर केवळ १ टेबल, २ खुर्च्या, सावलीसाठी मोठी छत्री/ताडपत्री/कापड टाकण्याची परवानगी असेल. परंतु, सदर केंद्रास स्थानिक प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल.

सदर केंद्रावर ३ x ४ १/२ फुटापेक्षा जास्त लांबी रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात येईल.

मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव/चिन्ह नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही.

येथे अनावश्यक गर्दी होणार नाही वा मतदारांना एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत द्यावे म्हणून भरीस पाडले जाणार नाही याची दक्षता स्थानिक पोलिसांनी घ्यावी. प्राप्त तक्रारीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/०१/२००७)

(xvi) मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल/कॉडलेस फोन/वायरलेस वापरणार नाही. (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/०१/२००७)

(xvii) मागील निवडणुकीतील मतदान प्रक्रियेशी निगडित गुन्हे, मतदानाची सरासरी, मतदार यादीतील फोटो, ओळखपत्र प्राप्त मतदारांची सरासरी, कुटुंबविरहित न सापडणाऱ्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन, भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रक क्रमांक-४६४/INST/२००८-EPS, दिनांक २४/१०/२००८ नुसार **संवेदनशील /अतिसंवेदनशील** मतदान केंद्रांची यादी तयार करावी.

अशी यादी पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मदतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी / मनपा आयुक्त यांनी तयार करावी व तद्नंतर अशा संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रात अतिरिक्त पोलीसवृंद,

आवश्यकतेनुसार डिजिटल / व्हिडिओ कॅमेरे लावणे, मतदारांची ओळख पटविताना विशेष काळजी घेणे यासारख्या उपाययोजना कराव्यात.

(xviii) भारत निवडणूक आयोगाकडील परिपत्रक क्र. ४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/१०/२००७ नुसार मतदार संघात असणाऱ्या **असुरक्षित/कमजोर मतदारांचा समूह/विभाग** असल्यास तो शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत काही महत्वाच्या सूचना पारित करण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही करण्यात यावे.

(a) तहसिलदार/गट विकास अधिकारी/पोलीस यंत्रणा, महानगरपालिका क्षेत्रात विभाग अधिकारी (ward officer) यांनी असे कमकुवत गट शोधून काढण्यात मदत करावी. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना पोलीस यंत्रणेला तात्काळ कळेल.

(b) अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी वारंवार भेटी देतील. तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोडींचा आढावा घेतील.

(c) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष देण्याचे सूचित करावे. अशा ठिकाणी मतदान कमी होत असल्याचे निदर्शनास आल्यास विशेष पथकाने तात्काळ भेट देऊन मतदारांना मतदान करण्याकामी प्रवृत्त करावे.

(d) असुरक्षित घटकांना मतदान प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याकामी आवश्यकतेनुसार स्वतंत्र मतदान केंद्र निर्माण करण्यास हरकत नसावी. (जरी असे मतदान केंद्र ५०० मतदारांपेक्षाही कमी असले तरी चालेल) अशा

कमकुवत मतदारांना जाणुन बुजून दूरवरच्या वा जिथे त्यांना मतदानास प्रतिबंध केला जाईल अशा विभागातील मतदान केंद्रास जोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याची जबाबदारी महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच महानगरपालिका वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सदर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(xix) (a) मतदान केंद्रांची यादी **नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार) किमान मुदती अगोदर अंतिम होणे आवश्यक राहील.** अंतिम मतदान केंद्राची यादी तयार करण्यापूर्वी सर्व तहसिलदार, महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध आहेत वा कसे? याची तपासणी करून आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करून घ्याव्यात.

(b) प्रारुप मतदान केंद्रांच्या यादीस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात तात्काळ **(संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार)** प्रसिध्दी द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील माजी पदाधिकारी/राजकीय पक्ष यांची बैठक आयोजित करून त्यांना ती यादी मोफत द्यावी. त्यांचे आक्षेप लेखी नोंदवून आवश्यक ते बदल (प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तेथे ते) समाविष्ट करून अंतिम यादी तयार करावी.

(c) अंतिम मतदान केंद्रांची यादीनुसार मतदान केंद्र दर्शविणारा नकाशा तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा, वाहतूकविषयक आराखडा (Transport plan) तसेच मतदान केंद्राच्या जवळचे पोलीस स्टेशन, मतदान केंद्रावरील दूरध्वनी, संपर्क अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांच्या संपर्क दूरध्वनीसह एक Communication Plan

तयार करावा.  तसेच वॉटस् अ‍ॅप, एसएमएस, ई-मेल यांचा वापर जास्तीत जास्त करावा व त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक व ई-मेल अ‍ॅड्रेस कम्युनिकेशन प्लॅनमध्ये समाविष्ट असावेत.

(d) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकामी राज्य निवडणूक आयोगाकडून नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांना संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रांच्या यादीसह उपरोक्त प्लॅन टिप्पणीसह पुरवावेत.

प्रदीप व्यास
27-5-2015

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र